महाराष्ट्र शासन
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय
दुसरा मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३.
Tel.No.Jt.Commr.२६२ ०२ ३८ Dy. Commr. २६६ ५५ ६९

वाचले - १) शासन निर्णय ,सा.प्र.वि.,अकंपा १०९३/२३३५/प्र. क्र.९०/९३/आठ, दि.२६.१०.१९९४ व दि.१२.०३.१९९७
२) शासन निर्णय, सा.प्र.वि. ,अकंपा १००४/प्र. क्र. ५१/२००४/आठ,दि.२२.०८.२००५
३) शासन परिपत्रक, सा. प्र.वि. ,अकंपा १००९/८२६/प्र. क्र. २०१/०९/आठ,दि. ०५.०२.२०१०
४) शासन परिपत्रक, सा.प्र.वि., अकंपा १०१०/प्र. क्र. २४४/आठ, दि.१३.१०.२०१०
५) शासन निर्णय, सा.प्र.वि., अकंपा १०१०/प्र. क्र. ३०८/१०/आठ, दि.०६.१२.२०१०
६) शासन निर्णय, सा.प्र.वि., अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ,दि.२१.०९.२०१७
७) शासन निर्णय, सा.प्र.वि., अकंपा १२१९/प्र. क्र. ५६/आठ, दि.१०.०६.२०१९ व दि.११.०९.२०१९
८) शासन निर्णय, सा.प्र.वि., अकंपा १२२१/प्र. क्र. १८६/का-८, दि.२६.०८.२०२१
९) शासन निर्णय, सा.प्र.वि., अकंपा १२१९/प्र. क्र. ५६/आठ, दि.२२.१२.२०२१.

## आदेश

क्रमांक - इएसटी १३२०१६ / ४८ / २-अ-३ (भाग-२) मुंबई, दिनांक 19 ऑक्टोंबर, २०२३.

उपरोक्त वाचले येथे नमुद शासन निर्णयांच्या अनुषंगाने अनुकंपा नियुक्तीकरीता स्वतंत्र सामाईक प्रतिक्षासुचीवरील दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या खाली नमुद उमेदवारांस अनुकंपा तत्वावर या विभागात वेतनस्तर (S-१ : १५०००-४७६००) मध्ये तात्पुरत्या स्वरुपात "चपराशी" पदावर नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या कार्यालयात करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव व पत्ता | प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती शुभदा रविंद्र गायकवाड,<br>पत्ता : १९३, न्यु तिऱ्हेगाव, वाडीया हॉस्पिटलसमोर, सोलापूर. | अ.जा. | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, छत्रपती संभाजीनगर |
| २ | श्रीमती सुकन्या सुशांत मोरे,<br>पत्ता- रुम नं. ४०४, न्यु साई दर्शन को.ऑ.हौ.सोसायटी (एस.आर.ए.) लि., शिवाजी नगर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६०. | अराखीव | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर |

उपरोक्त उमेदवारांची अनुकंपा उमेदवार म्हणून राज्य उत्पादन शुल्क विभागामध्ये "चपराशी" या पदावर वेतनस्तर (S-१ : १५०००-४७६००) अधिक इतर भत्ते वेतनश्रेणीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात खालील शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

१. उपरोक्त उमेदवारांची सदरची शासकीय नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपाची असुन ती पुर्वसूचनेशिवाय कोणत्याही वेळी समाप्त केली जाऊ शकेल.
२. नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून तीस (३०) दिवसाच्या आत पदनियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. उक्त मुदतीत हजर न झाल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. पुन्हा त्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्याचा दावा करता येणार नाही.
३. नियुक्ती अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही जिल्हा कार्यालयात ते बदलीस पात्र राहतील.
४. उपरोक्त उमेदवार यांची नियुक्ती, शासकीय सेवेसाठी वैद्यकियदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त होण्याच्या अधिनतेने करण्यात येत आहे. वैद्यकिय चाचणीबाबतच्या सूचना देण्यात आल्यानंतर त्यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे वैद्यकिय तपासणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

५. सदरची नियुक्ती ही त्यांच्या वैद्यकीय चाचणी तसेच पूर्वचारित्र्य व वर्तणूक यांच्या अनुकूल तपासणी अहवालावर अवलंबून राहील. असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास त्याबाबत कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येईल.

६. उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होण्यापूर्वी नियुक्तीच्या कार्यालयात शैक्षणिक पात्रता, वय, जात, अनुभव इत्यादी प्रमाणपत्राच्या प्रती सादर करावा. तसेच मुळ प्रमाणपत्रेही सादर करण्यात यावीत. तसेच संबंधितांचा वैयक्तिक अभिलेख कायमस्वरुपी जतन करावा. यथास्थिती जात पडताळणी प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करण्याची दक्षता घ्यावी.

७. नियुक्तीनंतर कोणत्याही कारणास्तव उपरोक्त उमेदवार यांना शासकिय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी नियमानुसार शासनास त्यासंबंधीची लेखी सूचना एक महिना आगाऊ देणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना एक महिन्याचे मूळ वेतन शासनाकडे जमा करावे लागेल.

८. उमेदवारास शासन सेवेत रुजू होतांना (अ) शासन निर्णय राजकीय व सेवा विभाग क्र.१५८१/३४, दि.०९.०८.१९८७ मध्ये विहित केल्यानुसार वचन लिहून द्यावे लागेल. (ब) शासन निर्णय सा.प्र. विभाग, क्र. ओओडी १०६४/३४४३/३२, दि.२३.०६.१९६४ मध्ये विहित केल्यानुसार भारतीय घटनेस एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागेल.

९. उमेदवारास शासन परिपत्रक सेवा विभाग क्र. सीएलआर १०५४, दि.३१.०१.१९५५ अथवा दि.१६.०१.१९५७ मधील तरतूदीनुसार प्रतिज्ञापत्र लिहून द्यावे लागेल.

१०. उपरोक्त उमेदवार यांना "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू राहील. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दि.२७.०८.२०१४ अन्वये, "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" (DCPS) ही "राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत" (NPS) समाविष्ट करण्यात आलेली आहे. मात्र निवृत्ती वेतन योजना (म्हणजे म.ना.से. निवृत्तीवेतन) नियम योजना त्यांना लागू होणार नाही.

११. उपरोक्त उमेदवार यांनी शासकिय कर्मचाऱ्यांकरिता विहित केलेल्या वर्तणूक नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. अन्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असणारे सर्व नियम व अटी आपणांस लागू राहतील.

१२. उपरोक्त वाचले क्र.४ वर नमुद शासन परिपत्रकातील निर्देशानुसार संबंधितांची यथास्थिती उपलब्ध उमेदवाराच्या संबंधीत प्रवर्गात अन्यथा खुल्या प्रवर्गात कायम करण्याची दक्षता घ्यावी.

१३. उमेदवारास वरील अटी मान्य आहेत असे गृहीत धरुन या विभागात चपराशी या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदनियुक्ती देण्याचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

( डॉ. विजय ना. सूर्यवंशी )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति, **(RPAD)**

१. श्रीमती शुभदा रविंद्र गायकवाड, पत्ता : १९३, न्यु तिऱ्हेगाव, वाडीया हॉस्पिटलसमोर, सोलापूर. ~~श्री. शुभम समीर हळबणकर, पत्ता- ४/२०, साई सिध्दी कंपाऊंड, उपाध्याय चाळ, कान्पाडा, बोरीवली(पू), मुंबई -४०००६६.~~

२. श्रीमती सुकन्या सुशांत मोरे, पत्ता- रुम नं. ४०४, न्यु साई दर्शन को.ऑ.हौ.सोसायटी (एस.आर.ए.) लि., शिवाजी नगर, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई ४०००६०.

(**मार्फत :** संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क)

प्रत- **माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.**

१. मा. महालेखापाल (ले. व अ. / ले.प.) महाराष्ट्र-१, मुंबई.

२. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.

३. लेखाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४. जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर/सोलापूर/छत्रपती संभाजीनगर.

५. विभागीय उप-आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क. ठाणे/पुणे/छत्रपती संभाजीनगर

६. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर/छत्रपती संभाजीनगर.
....वरील अटी व आवश्यक बाबींची विहीत कालावधीत पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांची राहील.

७. अधिदान लेखाधिकारी, बांद्रा (पूर्व), मुंबई.

८. जिल्हा कोषागार अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.

९. या कार्यालयातील सर्व कार्यासने, का.क्र. १२ (५ प्रती).
.... का.क्र. ८ यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त आदेश या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.

( सुनिल चव्हाण )
सह आयुक्त (प्रशासन)
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य. मुंबई